प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य यांचे कार्यालय
**अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी**बी विंग ,पहिला माळा ,
वनभवन ,सिव्हील लाईन्स ,रामगिरी रोड ,नागपूर 001 440
दुरध्वनी क्र2556916-0712 . , ईमेल-: apccfnodal@mahaforest.gov.in

**ई-मेलव्दारे/महत्वाचे**

क्र.कक्ष-१७/नोडल/आयडी-१३२३४./गड/ 2716 /२१-२२
नागपूर ४४० ००१, दिनांक 16 /०३/२०२२

प्रति,
वनसंरक्षक (प्रादेशिक)
गडचिरोली

**विषय : Proposal for Trenching and Laying 24 fibre BSNL OFC Line Bhagwanpur to Sawalkheda under NOFN Project, Ta.Kurkheda, Dist.Gadchiroli**(Revised Area 0.206 ha.) **(Area-2.04755 ha)**

**संदर्भ** :- वनसंरक्षक (प्रा), गडचिरोली यांचे कडील पत्र क्र.कक्ष-२(८)/जमीन/प्र.क्र.OFC. BSNL/2022/1360, दिनांक ०८/०३/२०२२

संदर्भिय पत्रान्वये प्राप्त झालेल्या प्रस्तावाची तपासणी केली असता त्या मध्ये खालील त्रृटी निर्देशनास आलेल्या आहेत.

१. क्षेत्र विवरण तपशीलामध्ये वनखंड व सर्वे क्रमांक निहाय क्षेत्राचा तपशील दिलेला आहे त्यामध्ये सदरची लांबी व रुंदी ही मीटर/कि.मी. मध्ये आहे त्या बाबत स्पष्टता करावी तसेच वनखंड व सर्वे क्रमांक निहाय जे क्षेत्रफळ चौ.मी./हेक्टर मध्ये दर्शविण्यात आलेले आहे ते चुकीचा पध्दतीने नमूद केलेले आहे.
२. प्रकल्प क्षेत्राकरिता लागणारे ऐकूण क्षेत्र हे सुध्दा चुकीचे नमूद केलेले आहे. जसे ०.२०६ हे. ऐवजी ०.०००२०४६ हे. असे नमूद असावयास पाहिजे.
३. वनक्षेत्र व वनेत्तर क्षेत्राची एकूण बेरीज सुध्दा चुकीची नमूद केलेली आहे.
४. सदर OFC Line ही वनखंड क्रमांक २९,३०,३१ व ७३० मधून प्रस्तावित असल्याचे पृष्ठ क्रमांक ४७ वरील नकाशा वरून दिसून येते परंतू क्षेत्र विवरण तपशीलामध्ये वन खंड क्रमांक ३० चा उल्लेख दिसून येत नाही. त्यामुळे याबाबत खुलासा करण्यात यावा.
५. क्षेत्र विवरणात सर्वे क्रमांक १२ नंतर ०.२१ X ०.४५ = 0.0९४५ असे क्षेत्र नमूद केलेले आहे परंतु ते क्षेत्र काय दर्शविते. (उदा. नदी/नाला/किंवा इतर कशाबाबतचे आहे) ते नमूद करावे.
६. सदर प्रस्तावासोबत OFC लाईनकरिता जे क्षेत्र वळती करण करावयाचे आहे त्या क्षेत्राची व पर्यायी वनीकरणाकरिता आवश्यक असलेल्या क्षेत्राची KML File in CD मध्ये दर्शवून सादर केलेली नाही.
७. प्रस्तावासोबत ग्राम पंचायत सावलखेडा व भगवानपुर यांनी ना-हरकत प्रमाणपत्र सादर केलेले आहे परंतू त्यावर सदर ग्राम पंचायतीचे सचिव यांनी स्वाक्षरी/जावक क्रमांक/दिनांक नमूद केलेला नसून रिक्त ना-हरकत प्रमाणपत्र सादर केलेला आहे. (पृष्ठ क्र.२२)
८. प्रकल्प यंत्रणेने पर्यायी वनीकरणाकरिता लागणा-या जमीनीचे मोबदल्यात देण्यात येणा-या मोबदला प्रमाणपत्रावर (पृष्ठ क्र.१२) दिनांक नमूद केलेला नाही.

९. संबंधित वनसंरक्षक/उपवनसंरक्षक यांचे कडून वरिष्ठ कार्यालयास प्रस्ताव सादर करताना त्यांचे स्तरावर बारकाईने तपासणी करून परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्या जात नाही. याबाबत यापूर्वी सुध्दा आपणांस लेखी सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असून सुध्दा त्याकडे हेतूपूरस्सर दुर्लक्ष केल्या जाते हे सदर प्रस्तावाचे तपासणी अंती दिसून येते. त्यामुळे यापूढे अशी पुनरावृत्ती होणार नाही याची, कृपया दक्षता घेण्यात यावी.

उपरोक्त त्रृटींची पूर्तता तात्काळ करण्यात यावी असे, आपणांस कळविण्याचे मला ~~आपणांस~~ निर्देश आहेत. तरी,याबाबत परिपूर्ण पूर्तता करण्यात यावी ही विनंती.

(श्री.पां.शि.पाखले) 16/3
सहाय्यक वनसंरक्षक
कक्ष-१७

प्रतिलिपी :- १.उपवनसंरक्षक (प्रा), वडसा वन विभाग वडसा यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह सादर.
२. उप महाप्रबंधक BSNL गडचिरोली यांना माहिती व पुढील कार्यवाहीस सस्नेह सादर.